

# क्लिअरिंग पद्धतीत आमुलाग्र बदल

**श्री. उदय पेंडसे**
**बँकिंग तज्ञ**

ग्राहकाभिमुख होऊन ग्राहकांना बँकिंग सेवेचा लाभ व्हावा यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक सातत्याने प्रयत्नशील असते. मोबाईल बँकिंग, भीम ॲप, क्यु.आर.कोड, यू.पी.आय., NEFT, RTGS, ही काही मासलेवाईक उदाहरणे. क्लिअरिंगला चेक पाठवला गेला, की खात्यावर जमा व्हायला आता दोन दिवस लागतात. म्हणजे आज चेक भरला की दुसऱ्या दिवशी खात्यात रक्कम जमा होते. आता यामध्येही रिझर्व्ह बँकेने आमुलाग्र बदल करण्याचे सूतोवाच केले आहे.




नुकत्याच सादर केलेल्या पतधोरणामध्ये रिझर्व्ह बँकेने या पद्धतीचा उल्लेख केला होता. त्याप्रमाणे निरंतर क्लिअरिंग (Continuous Clearing) पद्धत सुरू करण्याबाबत NPCI ने मार्गदर्शनपर सूचना जारी केल्या आहेत. त्या सूचनानुसार बँकांनी एकाच वेळी क्लिअरिंगला चेक पाठवण्याची पद्धत बंद होणार असून, सकाळी १० ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत बँकांनी चेक क्लिअरिंगला सतत पाठवायचे आहेत. चेक क्लिअरिंगला पाठविल्यानंतर संबंधित बँकेने ग्राहकाच्या खात्याला त्वरित सदर चेक नावे टाकणे अपेक्षित आहे. खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसेल तर तीन तासांच्या आत तो चेक रिटर्न करणे आवश्यक आहे. सकाळी १० ते ११ च्या दरम्यान भरलेले चेक्स दुपारी २ वाजायच्या आत परत करणे अभिप्रेत आहे. चेक परत केला गेला नाही, तर त्याचा अर्थ तो चेक पास झाला, असे गृहीत धरले जाणार आहे.

चेक्स क्लिअरिंगसाठी सादर करायची मर्यादा सायंकाळी ४ वाजेपर्यंत असणार आहे. म्हणजेच त्या दिवशी सायंकाळी ४ वाजेपर्यंत सादर झालेल्या चेक्सचं भवितव्य सायंकाळी ७ वाजता स्पष्ट होणार आहे. यामुळे ग्राहकांचा फायदा होणार असून, चेकद्वारे मिळालेली रक्कम तीन तासांतच खात्यात जमा होईल.

या नवीन पद्धतीमुळे बँकाना त्यांच्या कामकाजातही बदल करावे लागणार आहेत. शाखा व बँकेच्या केंद्रीय कार्यालयातील क्लिअरिंग डिपार्टमेंटचा सतत संपर्क गरजेचा राहणार आहे. शाखेतील कर्मचाऱ्यांनीही सतर्क राहून क्लिअरिंगचे चेक्स तातडीने केंद्रीय कार्यालयाकडे पाठविणे आणि आपल्या ग्राहकांच्या खात्याला नावे टाकण्यासाठी आलेल्या चेक्स् बाबत त्वरीत निर्णय घेणे अत्यावश्यक आहे. म्हणजेच खात्यावर रक्कम



शिल्लक नसेल तर तो त्वरीत परत करण्यासाठी केंद्रीय कार्यालयाकडे पाठविणे गरजेचे राहील.




बँकांना या नवीन निरंतर क्लिअरिंग पद्धतीची जाणीव ग्राहकांना करून द्यावी लागेल. ग्राहकांना याविषयी सविस्तर माहिती सांगून, खात्यामध्ये पुरेशी रक्कम शिल्लक ठेवून नंतरच धनादेश अदा करावा अशी जागरूकता, सवय अंगी बाणवावी लागेल. अन्यथा याचा अधिक मनस्ताप शाखेतील कर्मचाऱ्यांना सहन करावा लागणार आहे.

दि. ०१ जानेवारी, २०२५ पासून ही पद्धत अमलात आणली जाणार आहे. तर दि. ०१ ऑक्टोबर, २०२४ रोजी या पद्धतीची अंमलबजावणी कशी होते ते प्रायोगिक तत्त्वावर पडताळले जाणार आहे. ही पद्धत ग्राहकांच्या फायद्याची असली तरी बँकांना त्यांच्या शाखांसाठी काही पायाभूत सुविधा जसे की स्कॅनर्स, सॉफ्टवेअर मध्ये बदल इ. खर्च करावे लागणार आहेत. काही बँकांच्या कामकाजाच्या वेळाही बदलाव्या लागतील व त्याकरिता अतिरिक्त खर्चही बँकांना सहन करावे लागणार आहेत.

*****

